Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३९] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ३०-ऑक्टोबर ६, २०२१/आश्विन ८-१४, शके १९४३ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १–७ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५५.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, कलम ११(१) अन्वये.—**

क्रमांक-कावि-कली-विभूअ-म.प्र.-७७२–२०२१.——

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम (३) च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याचा संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.);

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु , उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क महाराष्ट्र नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ई) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी कलम ३ च्या खंड (ई) मधील परंतुकाच्या खंड (ग) अन्वये विशेष भूसंपादन अधिकारी, जिगाव प्रकल्प (कंत्राटी) क्र. ३, जिगांव प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जिगांव प्रकल्पासाठी संपादित होत असलेले बुडीतक्षेत्र

भूसंपादन प्रकरण क्रमांक १-२०२१-२०२२, मौजे गोळेगाव खुर्द, ता. जळगांव जा., जि. बुलडाणा

| अनुक्रमांक | गट नंबर | संपादित करावयाचे एकूण क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १ | १ १५ |
| २ | १ | १ १५ |
| ३ | २ | १ २१ |
| ४ | २ | १ २१ |
| ५ | २ | १ २१ |
| ६ | ३ | ० ९२ |
| ७ | ४ | १ ५९ |
| ८ | ५ | ६ ०० |
| ९ | ६ | ० ६५ |
| १० | ७ | १ ४८ |
| ११ | ७ | १ ४८ |

अनुसूची-एक–चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | हे. आर |
| १२ | ८ | ० ४४ |
| १३ | ९ | ० ५६ |
| १४ | ९ | ० ६२ |
| १५ | ९ | १ ७७ |
| १६ | ९ | ० ७३ |
| १७ | १३ | २ ३० |
| १८ | १४ | ० ०६ |
| १९ | १५ | १ २९ |
| २० | १६ | ० ४९ |
| २१ | १६ | ० ०२ |
| २२ | १७ | १ ५६ |
| २३ | १८ | ० १४ |
| २४ | १८ | ० ०६ |
| २५ | १९ | १ १० |
| २६ | ४२ | २ ८४ |
| २७ | ४३ | ० १६ |
| २८ | ४६/अ | ० ०२ |
| २९ | ४६/ब | ० १४ |
| ३० | ४६/क | ० ८७ |
| ३१ | ५५ | ० ०५ |
| ३२ | ५६ | १ ४६ |
| ३३ | ५६ | ० ५५ |
| ३४ | ५७ | ० ४१ |
| ३५ | ५८ | २ ३६ |
| ३६ | ५९ | ० ८१ |
| ३७ | ५९ | १ ३४ |
| ३८ | ५९ | १ ३४ |
| ३९ | ६०/अ | ० ८१ |
| ४० | ६०/ब | ० ७७ |
| ४१ | ६१ | १ ३७ |
| ४२ | ६२ | ० ५५ |
| ४३ | ६३ | १ ३४ |
| ४४ | ६४ | १ ०६ |
| ४५ | ६५ | ० ०९ |
| ४६ | ६५ | ० ९२ |
| ४७ | ६६ | १ ६२ |
| ४८ | ६६ | ० ८२ |
| ४९ | ६७ | ० ४६ |
| ५० | ६७ | १ २१ |
| ५१ | ६८ | ० ७० |
| ५२ | ६९ | ० ४१ |
| ५३ | ७० | ० २१ |

**अनुसूची-एक–चालू**

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | हे. आर |
| ५४ | ७० | ० ६१ |
| ५५ | ७१ | १ २० |
| ५६ | ७१ | ० ५८ |
| ५७ | ७२ | ५ ११ |
| ५८ | ७३ | ० ३८ |
| ५९ | ७३ | ० ५३ |
| ६० | ७५ | ० ८२ |
| ६१ | ७६ | १ ५९ |
| ६२ | ७९ | १ १७ |
| ६३ | ८० | ० ९६ |
| ६४ | ८१ | ० ९४ |
| ६५ | ८२ | २ २४ |
| ६६ | ८३ | १ ०० |
| ६७ | ८३ | १ ७२ |
| ६८ | ८४ | ० ७२ |
| ६९ | ८५ | ० ५७ |
| ७० | ८६ | ० १० |
| ७१ | ८७ | १ ७५ |
| ७२ | ८८ | ० ४० |
| | एकूण संपादन क्षेत्र . . | ७६ २७ |

**अनुसूची—दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | जिगांव प्रकल्प, ता. नांदुरा, जिल्हा बुलडाणा. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | भू. सं. प्र. क्र. ०१/२०२१-२२, मौजे गोळेगाव खुर्द, ता. जळगाव जा., जिल्हा बुलडाणा येथील खाजगी जमिनी जिगाव प्रकल्पात बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे कार्यकारी अभियंता, जिगाव प्रकल्प, पुनर्वसन विभाग, खामगांव यांचेकडून आलेला प्रस्ताव. एकूण क्षेत्र ७६.२६ हे. आर |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभांबाबत) | :— | या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे. |

**अनुसूची—तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सदरचा प्रकल्प हा विदर्भ सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी असून दुष्काळ प्रवण भागातील क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम भागात शेत जमिनीवर आहे. यामध्ये मौजे गोळेगांव खुर्द, ता. जळगाव जा., येथील शेती बाधित होत असल्यामुळे त्याचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. मौजे गोळेगाव खुर्द, ता. जळगाव जा., या गावातील ७६.२६ हे. आर शेत जमीन बुडीत क्षेत्रात येत आहे.

**अनुसूची—चार**

**सामाजिक परिणाम निर्धारणाचा सांराश**

नवीन भूसंपादन कायदा, २०१३ (२०१३ चा ३०) यामध्ये कलम (६) मधील पोट-कलम २ चे परंतुकामधिल तरतुदीप्रमाणे लागू नाही.

**अनुसूची—पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम | . . | जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बुलडाणा. |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाच्या पत्ता | . . | जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा. |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील. | . . | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांची अधिसूचना क्र. आर. पी. ए. २०१५-प्र.क्र. १२९-(२) र-१, दिनांक १०-०६-२०१५. |

**टीप :—**उक्त जमिनीच्या संयुक्त मोजणी नकाशे/कागदपत्रे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मध्यम प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

बुलडाणा :
दिनांक २५ ऑगस्ट २०२१.

**एस. रामामुर्ती,**
जिल्हाधिकारी, बुलडाणा.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५६.

## जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भ :—**(१) पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्र. जिविशा-का.व.सु.-प्रतिबंधक-२०२१-३६७९, दिनांक ०८ सप्टेंबर २०२१.

(२) या कार्यालयाचे आदेश क्र. कक्ष-३-आ.व्य.-कलि.-कावी-१३५३-२०२१, दिनांक १३ ऑगस्ट २०२१.

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये आदेश लागू करणेबाबत**

क्रमांक कक्ष-८-अ.का.(गृह)-कावि-६६९-२०२१.—

ज्याअर्थी, वाशिम जिल्ह्यात दिनांक १०-०९-२०२१ रोजी श्री गणेश स्थापना होणार असून दिनांक १९-०९-२०२१ ते दिनांक २१-०९-२०२१ पावेतो श्री गणेश विसर्जन मिरवणुका शहरी व ग्रामीण भागात निघण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सद्यस्थितीत जिल्ह्यात कोरोना विषाणू संसर्ग प्रादुर्भाव कायम असल्याने कोविड-१९ प्रतिबंधक उपायाअंतर्गत निर्गमित प्रतिबंधक निर्देशांचे अनुपालनाचे दृष्टीने निरंतर कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत 'मराठा' आरक्षण सदंर्भातील मागणीचे अनुषंगाने 'मराठा' समाज बांधवांच्या भावना अत्यंत तीव्र असून राज्यात विविध ठिकाणी आंदोलने सुरू आहेत, त्या धर्तीवर वाशिम जिल्ह्यात अचानकपणे तीव्र स्वरुपाच्या आंदोलनात्मक कार्यक्रमाचे आयोजनाची शक्यता नाकारता येत नाही. तसेच नोकरीमध्ये पदोन्नतीस मागासवर्गीयांना ३३% आरक्षण कायम ठेवावे या मागणीसाठी विविध कर्मचारी संघटनाकडून विविध प्रकारच्या आंदोलनांचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्र सरकारने मंजूर केलेले कृषी विधेयक, शेतकरी कर्जमाफी, पीक कर्ज मंजुरी, दूध दरवाढ, वाढती महागाई, विज बिल माफी, शेतक-यांना नुकसान भरपाई तसेच इतर विविध मागण्यासंदर्भात विरोधी पक्षाचे वतीने तसेच शेतकरी संघटना इत्यादीचे वतीने आंदोलनान्क कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या आणि सण उत्सवाचे दृष्टीने अत्यंत संवेदनशील असून जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया आगामी सण-उत्सवाचे काळात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखणे सुलभ व्हावे या करीता दिनांक १३-०९-२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २७-०९-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होणे बाबतचे, पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संदर्भिय पत्र क्रमांक (१) या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा.प्र.से.), जिल्हादंडाधिकारी, वाशिम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकारांचा वापर करुन दिनांक १३-०९-२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २७-०९-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पारित करीत आहे. सदर आदेश लागू केल्यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टीकरीता मनाई करण्यात आलेली आहे;

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारिरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तिक्ष्ण वस्तू जवळ बाळगणे.

२. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास.

३. दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधणे जवळ बाळगणे, जमा करणे, किंवा तयार करणे.

४. व्यक्तींची प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बिभत्स प्रदर्शन करणे.

५. वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे, अशा प्राधिकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितिमत्ता यांस धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथून पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणणे, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/ वस्तू तयार करणे किंवा त्याचा लोकांमध्ये प्रसार/प्रचार करणे.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास एकत्र जमण्यास किंवा मिरवणुकीस मनाई करीत आहे. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय आदेश क्रमांक (२) अन्वये वाशिम जिल्ह्यामध्ये कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनाचे अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या बाबींचे पालन करून प्रस्तुत आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर शासकीय/निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह, अत्यंयात्रा तसेच सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस व कार्यक्रमास लागू राहणार नाहीत. उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक १३-०९-२०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २७-०९-२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत कार्यान्वित राहतील.

प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरुप योग्य कारण असेल व तसे करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणताही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणुका कराव्यात.

वाशिम :
दिनांक ९ सप्टेंबर २०२१.

**शण्मुगराजन एस.** (भा.प्र.से.),
जिल्हादंडाधिकारी, वाशिम.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५७.

## अपर जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**वाचा :—** (१) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडील पत्र क्र. जिविशा-प्रति आदेश-२९९५-२०२१, दिनांक १३ सप्टेंबर २०२१.

### आदेश

क्रमांक-गृहशाखा-डेस्क-१२-कावि-९२४-२०२१.—

ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी यवतमाळ जिल्ह्यात ओबीसी आरक्षण संदर्भात निदर्शने, मोर्चा, आंदोलने तसेच मराठा आरक्षण, कृषी कायदा विरोधात तसेच विजबिलासंदर्भात जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलन होण्याची शक्यता नाकरता येत नाही. तसेच गणेश उत्सव विसर्जन आहे, शेतक-यांच्या वतीने कर्जमाफी, कांदा निर्यात बंदी व तसेच या काळात हिंदु, मुस्लीम व अनुसूचित जातीच्या संघटनातर्फे विविध कारणावरून मिरवणुका, रॅली व मोर्चा सारखे आंदोलने करण्याची शक्यता नाकारता येत नाही. इतर विरोधी राजकीय पक्ष, संघटना, सामाजिक संघटना, कामगार, कर्मचारी संघटना यांचे द्वारा त्यांचे मागण्यावर शासनाचे लक्ष केंद्रीत करण्याकरिता धरणे, निवेदने, मोर्चा, उपोषण इ. स्वरुपाचे आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाव्य कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव पाहता यवतमाळ जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याचा दृष्टीने दिनांक १६-०९-२०२१ चे ००.०१ वा. (मध्यरात्री पासून) ते दिनांक ३०-०९-२०२१ चे २४.०० वा. (मध्यरात्री पर्यंत) जिल्ह्यात कलम ३७ (१) (३) महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याबाबत कळविले आहे.

तरी वरिल काळात यवतमाळ जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी, ललितकुमार व-हाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ याद्वारे आदेशित करतो की, शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-या व्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्याजवळ,

१. शस्त्र, काठी, तलवार, बंदुका बाळगणार नाहीत,

२. लाठ्या, काठ्या किंवा शारिरिक इजा होण्यास ज्या कारणीभूत ठरतील व सहज हाताळता येतील अशी कुठलीही वस्तू जवळ बाळगणार नाहीत,

३. कोणतेही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक द्रव्य बाळगणार नाहीत,

४. दगड, क्षेपणिक उपकरणे किंवा ब्लास्टींग किंवा प्रवर्तक क्षेपणास्त्रे गोळा करून ठेवणार नाहीत किंवा जवळ बाळगणार नाहीत,

५. आवेशी भाषणे/अंगविक्षेप/विटंबनात्मक नकला करणार नाही, सभ्यता व नितीमत्तेला बाधा येईल किंवा ज्यामुळे जिल्ह्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा अशी कोणतीही वस्तू जवळ बाळगणार नाहीत किंवा ठेवणार नाहीत, व्यक्तींच्या किंवा शवांच्या किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाहीत.

६. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजून दुखावण्याच्या उद्देशाने वाद्य वाजविणार नाहीत किंवा जाहिरपणे असभ्य वर्तन करणार नाहीत.

तसेच, ज्याअर्थी, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) यवतमाळ जिल्ह्यात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर एकत्र जमण्यास मनाई करीत आहे.

आणखी असेही आदेशित करीत आहे की, प्रस्तुत आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर कोणतेही शासकीय कर्तव्यावर कार्यरत शासकीय/निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा तसेच समक्ष अधिकारी यांनी विशेषरित्या मिरवणुका/कार्यक्रम यांना (शासकीय/निमशासकीय कर्मचारी यांचे धरणे/आंदोलन इ. वगळता) सूट देण्याचे अधिकार संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस स्टेशन अधिकारी यांनी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

ज्या शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांना धरणे/आंदोलन/निदर्शने करावयाचे असेल व त्याकरिता ५ पेक्षा अधिक संख्येने जमावयाचे असल्यास त्याकरिता पोलीस अधीक्षक, यवतमाळ याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. त्यांना अशी परवानगी मागणारा अर्ज धरणे/आंदोलन/निदर्शने करावयाच्या दिनांकाच्या किमान १० दिवस अगोदर सादर करणे बंधनकारक असेल.

सदरील आदेश मी, यवतमाळ जिल्ह्याचे हद्दीपावेतो लागू करीत आहे. सदरचा आदेश दिनांक १६-०९-२०२१ चे ०.०१ वा. (मध्यरात्री पासून) ते दिनांक ३०-०९-२०२१ चे २४.०० वा. (मध्यरात्री पर्यंत) अंमलात राहील. हा आदेश बहुसंख्य व्यक्तींना लागू असल्यामुळे या आदेशाची प्रसिद्धी दवंडीद्वारे/ध्वनीक्षेपकाद्वारे तसेच इतर सर्व प्रसिद्धी माध्यमाद्वारे पोलीसांनी करावी. तसेच सदर आदेश सर्व उपजिल्हाधिकारी/तहसीलदार/पोलीस स्टेशन यांचे कार्यालाचे नोटिस बोर्डावर लावून प्रसिद्धी देण्यात यावी.

हे आदेश दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमित करीत आहे.

यवतमाळ :
दिनांक १५ सप्टेंबर २०२१.

**ललितकुमार व-हाडे,**
अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.